# गांधीवादाची प्रासंगिकता : काही निरीक्षणे

**डॉ.लक्ष्मण भानुदास साठे,** संपर्क:९९६०४८५९२५

---

**प्रस्तावना :**

वसाहतकालीन आणि उत्तर वसाहतकालीन कालखंडात गांधीजीवन आणि गांधीविचारांची होणारी चर्चा म्हणजे गांधी प्रभावाचे महत्त्व सिद्ध करणारी बाब आहे. समकालीन संदर्भात गांधी विचारांचे मोल काय आहे याची खोलवर मीमांसा आज घडत आहे. गांधींच्या सत्याग्रहांची सूक्ष्म चिकित्सा करून यथायोग्य आकलनाचा प्रयत्नही सुरू आहे. जगभरात गांधी तत्त्वज्ञानातील सत्य, अहिंसा, सत्याग्रह या मूल्यांचे अनुकरण करत अनेक विचारवंतांनी क्रांतिकारक कार्य केले आहे. आधुनिक राष्ट्राची उभारणी गांधी तत्त्वावर घडलेली असताना त्यांच्या विचारांची आज पुन्हा चर्चा करण्याचे औचित्य काय असू शकते या प्रश्नाच्या उत्तराजवळ जाण्याकरिता वर्तमान सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवन आधार ठरते. ते समजून घेण्याकरिता गांधी तत्वांची स्थळ- काळ सापेक्षता महत्त्वाची आहे. ती अधोरेखित करणे आवश्यक वाटते.

गांधीजींचा सत्याग्रहाचा सिद्धांत आणि कृती ही अभिनव होती. राष्ट्रवाद हे मूल्य रुजवण्याचे प्रयोग नाविन्यपूर्ण होते. कार्याचे स्वरूप लोकशाहीवादी होते. शिक्षणविषयक विचारात व्यक्तीचा आणि राष्ट्राचा विकास केंद्रस्थानी होता. धर्म व धर्म संस्थांच्या संदर्भातील दृष्टिकोनात मानवतावादाचे ध्येय आणि आधुनिकतेचा स्वीकार होता. ब्रिटिश साम्राज्यशाहीशी त्यांनी केलेला संघर्ष आणि व्यवहार कित्येक पिढ्यांना मार्गदर्शक ठरतो आहे. भारतीय समाज व्यवस्थेची विविध मूल्यांच्या शिकवणीतून केलेली पुनर्रचना गांधी तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, साहित्य, कायदा, निसर्गोपचार, ब्रह्मचर्य आदी ज्ञानक्षेत्रांबद्दल त्यांचे सखोल चिंतन होते. त्या चिंतनातून गांधीजींची जी जीवनशैली बनली त्यास गांधीवाद असे संबोधले जाते. प्रस्तुत शोधनिबंधात गांधीवादाची प्रासंगिकता तपासणे हा प्रमुख उद्देश आहे.

**गांधीवादाचे स्वरूप :**

गांधीवाद नावाची कोणतीही गोष्ट अस्तित्वात नाही असे खुद्द गांधींनीच म्हटले होते ; तर गांधीवाद कशास म्हणावे हा प्रश्न पडतो. गांधीविचार हा एक खुला अवकाश आहे. यामध्ये समग्र गांधी जीवनाचे मर्म समजून घेऊन मूल्यात्मक परंपरेचा डोळसपणे केलेला स्वीकार होय. गांधींनी आपल्या लेखनामधून प्रतिपादलेली विचारसरणी जी त्यांची एक जीवनपद्धती होती त्यास गांधीवाद म्हणतात. गो. म. कुलकर्णी यांनी गांधीवादा संदर्भात व्यक्त केलेले मत असे होते की, "गांधीवाद हा पारंपरिक भारतीय अध्यात्म धारणांचा, त्यात काही पाश्चात्त्य तत्त्व कल्पनांचे मिश्रण असलेला आधुनिक अवतार आहे"१. याचा अर्थ गांधी विचारांमध्ये भारतीय देशी मूल्य विचार आणि पाश्चात्य विचारांचा समावेश आहे. सत्य, अहिंसा, अपरिग्रह, ब्रह्मचर्य व अस्तेय हे नैतिक नियम त्यांच्या विचारसरणीचे पायाभूत घटक होते.

गांधीजींनी सत्यास अनन्यसाधारण महत्त्व दिले. आपल्या जीवनात त्यांनी सत्याचे प्रयोग केले. सत्याच्या आधारे आपणास परमेश्वराचे दर्शन घडते हा त्यांचा विचार वैश्विक होता. माझे सत्याचे प्रयोग या आपल्या आत्मकथनाच्या प्रस्तावनेत त्यांनी ग्रंथ लेखनाचा उद्देश सांगितलेला आहे. ते म्हणतात की, "या पुस्तकात राजकीय प्रयोगांविषयी न लिहिता अध्यात्मिक आणि मूल्यांविषयी प्रयोगाबद्दल लिहायची इच्छा आहे यामध्ये अहिंसा, ब्रह्मचर्य इत्यादी नियमांचे ही प्रयोग येऊन जातील. हे नियम सत्याहून भिन्न समजले जातात परंतु माझ्या मते सत्यच सर्वश्रेष्ठ आहे आणि त्यामध्ये अगणित वस्तूंचा समावेश होऊन जातो. हे सत्य म्हणजे वाचक सत्य नव्हे; तर जसे वाचेचे तसे विचारांचेही. हे सत्य म्हणजे आपण कल्पलेले सत्य तेवढेच नव्हे तर स्वतंत्र शाश्वत सत्य. म्हणजे परमेश्वरच".२( गांधी, प्रस्तावना, पृष्ठ ८-९) याचा अर्थ सत्य आणि अहिंसा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अहिंसा हे ध्येय आहे आणि सत्याने वागणे हा त्या ध्येयाप्रत जाण्याचा मार्ग आहे असे गांधीजी सांगतात.

गांधीजी आपल्या सार्वजनिक जीवनात ज्या सत्याचा आग्रह धरतात त्यामध्ये अहिंसा, ब्रह्मचर्य यांचाही अंतर्भाव होतो. हिंसा म्हणजे केवळ हत्या नव्हे तर दुसऱ्यास दुखावणे ही सुद्धा हिंसाच आहे. क्रोध, घृणा, राग, वाईट भावना, अपशब्द यामुळे हिंसा घडू शकते. या सर्व गोष्टींपासून लोकांना परावर्त करण्यासाठी गांधीजी प्रयत्न करताना दिसतात. त्यांच्या विचार आणि कृतीत साधर्म्य दिसून येते. नैतिक वर्तन हा त्यांच्या जीवनाचा आधार होता. यामध्ये अस्वस्थता,

भांडण, युद्ध, विनाश या गोष्टींना थांबवण्याचे सामर्थ्य असते यावर गांधीजींचा विश्वास होता. नैतिक वर्तन घडण्यासाठी आत्मनिरीक्षण करावे लागते. स्वतःच्या मनात डोकावून बघावे लागते. दुसऱ्याबद्दल चांगले विचार मनात येणे तसेच दुसऱ्यासाठी झिजणे हा नैतिकतेचा अविष्कार आहे असे गांधीजी मानत व त्याप्रमाणे स्वतःचे वर्तन नियंत्रित करीत असत.

साध्य साधनसुचिता हे गांधी जीवनातील महत्त्वाचे तत्व होते. गांधीजींची अशी धारणा होती की चांगले ध्येय साध्य करण्यासाठी चांगली साधने आवश्यक आहेत. चुकीचे साधन कधीही चांगल्या अंताचा आधार होऊ शकत नाही. मैकियाव्हेली असे म्हणतो की, 'हेतूच साधनांची श्रेष्ठता सिद्ध करतो'. म्हणजे उपयोगात आणली जाणारी साधने जशी महत्त्वाची असतात तशाच प्रकारे वापरणाऱ्यांचा हेतूही महत्त्वपूर्ण असतो. गांधीजी हिंसेच्या विरोधात होते म्हणूनच त्यांनी भारतीय वेदशास्त्रांमध्ये वर्णन केलेल्या विधीनुसार साधनांचा अवलंब करण्याचा आग्रह धरला. अंताच्या शुद्धतेवर आणि साधनांवर त्यांचा गाढ विश्वास होता. गांधीजी म्हणतात की, मला माहित आहे की जर आपण साधनांची काळजी घेतली तर शेवटची प्राप्ती निश्चित होते. मला असेही वाटते की आपल्या अंतप्राप्ती ही आपल्या साधनेच्या शुद्धतेच्या पूर्ण प्रमाणात होईल. याचा अर्थ गांधीजी कोणत्याही किमतीत साधनांची शुद्धता राखण्याच्या बाजूने होते. अनैतिक मार्गाने त्यांना स्वातंत्र्य सारखे चांगले आणि पवित्र ध्येय साध्य करावयाचे नव्हते म्हणून त्यांनी साधनांच्या शुद्धतेवर अधिक भर दिल्याचे दिसून येते. मुसोलिनी, लेनिन, हिटलर या समकालीन प्रभावी नेतृत्वांनी, विचारवंतांनी वापरलेल्या साधनांपेक्षा गांधीजींनी उपयोगात आणलेली साधने वेगळी होती. याचा शेवट चांगला झाल्याचे सिद्ध होते.

शांततामय संघर्ष आणि सत्याग्रह या सूत्रांचा उपयोग गांधींनी केला. सामान्यातल्या सामान्य माणसापर्यंत आपली विचारधारा पोहोचविली. हरिजन मध्ये लिहिलेल्या लेखात गांधीजी म्हणतात, "सत्याग्रह हे शस्त्र असं आहे की, माझ्या पत्नी कस्तुरबा यांना ज्यावेळी असं वाटते की मी तिच्यावर अन्याय करतो त्यावेळी माझ्याविरुद्ध सत्याग्रहाचे शस्त्र उपसायला परवानगी आहे. स्वतंत्र भारतात तर ती सर्वांनाच आहे". मात्र हे शस्त्र शांततामय मार्गाचे असलं पाहिजे. अहिंसात्मक असलं पाहिजे याची जाणीवही ते करून देतात. सत्याग्रहाचा अर्थ आणि महत्त्व अगदी सहजपणे पण तितक्याच पारदर्शीपणे उदाहरणाद्वारे गांधीजी जे पटवून देतात ते अत्यंत मौलिक आहे. ब्रिटिशांच्या अन्यायाविरुद्ध त्यांनी याच मार्गाचा अवलंब केला होता हे सर्वचित आहे.

गांधीजींनी आपल्या जीवनात अपरिग्रह आणि अनासक्ती ( नोन पोझिशन आणि नॉन अटॅचमेंट ) या जीवनमूल्यांवर भर दिला. सर्वधर्म समभावाची भूमिका घेतली. धर्म हे मनुष्य आणि ईश्वरातील नाते ते मानत होते. त्यांनी धर्माचा अर्थ प्रेम, अहिंसा आणि शांती असा ठरविला होता म्हणूनच ते सर्व धर्माकडे समत्वाने पाहत होते. यंग इंडियाच्या लेखात गांधी लिहितात, " मी कट्टर हिंदू असतानाही माझ्या धर्मात ख्रिश्चन, मुस्लिम या सर्व धर्मातील उपदेशांकरीता स्थान आहे आणि यामुळेच काही लोकांना माझे विचार भिकाऱ्याप्रमाणे वाटतात तर काहींना मी सार संकलन करणारा आहे असे वाटते. एखाद्याला सार संकलक म्हणतात याचा अर्थ त्या माणसाचा कोणताच धर्म नाही असा होत असतो. उलट माझा धर्म एक व्यापक धर्म आहे व तो ख्रिश्चनांच्याच काय परंतु प्लाय माऊथब्रदर्स सारख्यांच्याही विरोधी नाही. तसेच तो कट्टराहून कट्टर मुसलमानांचाही विरोध करीत नाही. व्यक्तीच्या कट्टरपणामुळे तिला बरे वाईट म्हणायची माझी तयारी नाही. कारण मी कोणत्याही व्यक्तीला तिच्या स्वतःच्या दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न करतो. माझा हा व्यापक धर्मच मला जिवंत ठेवतो."३ ( यंग इंडिया २२ डिसेंबर १९२७ पृष्ठ ४२६) याचा अर्थ गांधी सर्व धर्माचा आदर करत होते. धर्मनिरपेक्षता हाच त्यांचा दृष्टिकोन होता. ते समता धर्माचा आग्रह धरत होते.

गांधीजी अस्पृश्यता, जातीव्यवस्था संपवण्याचा विचार मांडतात. मानवी श्रमाला विशेष महत्त्व देतात. माणूस घडविणाऱ्या शिक्षणाची अपेक्षा व्यक्त करतात. गांधीजी हे समन्वयवादी होते केवळ आदर्श कडे बघून ते चालत नव्हते तर आदर्शाला व्यवहारिकतेची जोड त्यांनी दिलेली होती. मुलोद्योगी शिक्षण पद्धतीचा त्यांनी पुरस्कार आणि प्रसारही केला. गांधीजींच्या विचार आणि कृतीमुळे भारतीय समाजाच्या जीवनात क्रांतिकारक बदल घडून आला. स्वतः अध्यात्मवादी असणाऱ्या गांधीजींच्या व्यवहाराची दिशा आणि जनमानसावरील प्रभाव विचारात घेऊन त्यांच्या तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता तपासणे अनिवार्य वाटते.

**गांधीवादाची प्रासंगिकता** : काही निरीक्षणे

आज विज्ञान तंत्रज्ञानाचे युग आहे. औद्योगीकरणाचा विस्तार प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. शहरीकरणाचे स्वरूप विस्तारत आहे आणि धार्मिक द्वेषात वाढ होताना दिसून येत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास,

भांडवलशाही, विषमता, नैतिकता या संदर्भातील प्रश्न सातत्याने भेडसावत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर गांधी तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता तपासली पाहिजे. १९२४ मध्ये भारतीय समाजातील सप्तदोष गांधीजींनी सांगितलेले होते. आजही त्या विचारातील समकालीनत्व प्रत्ययास येते. तत्त्वाविना राजकारण, श्रमाविना संपत्ती, नीतीविना व्यापार, चारित्र्यविना शिक्षण, सदसदविवेकबुद्धीविना विकास, मानवतेविना विज्ञान आणि त्यागाविना पूजा हे ते सात दोष आहेत.

भारतीय राज्यघटना आणि राजकारण लोकशाहीचा केंद्रबिंदू आहे. राज्यघटनेत स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, एकात्मता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही ही मूलभूत तत्वे समाविष्ट आहेत. या प्रत्येक मूल्यासंदर्भात राजकीय नेतृत्वाची भूमिका कोणत्या स्वरूपाची आहे याचा विचार केल्यास लोकशाही समोर आव्हान उभे राहिल्याचे दिसून येते. लोकशाहीत सत्ता महत्त्वाची असून ती निवडणुकांद्वारे प्रस्थापित होते. आज राजकारणात पैसा, प्रतिष्ठेला महत्त्व दिले जात आहे. साधनसुचिता हरवत चाललेली दिसून येत आहे. लोककल्याणकारी दृष्टी संपून इव्हेंट करण्याकडे नेतृत्वांचा कल वाढतो आहे. प्रसिद्धीकरता नेतृत्वात चढाओढ असून मतदारांना आमीष देऊन, लोकप्रतिनिधींना खरेदी करून लोकशाही मूल्यांना पायदळी तुडविले जात आहे. गांधीजींनीच म्हटले होते की, लोकशाही ही फार मोठी संस्था आहे म्हणून तिचा अधिक दुरुपयोग होण्याची शक्यता जास्त आहे पण म्हणून लोकशाही टाळणे हा त्यावरचा उपाय नसून तिचा दुरुपयोग होण्याची संभाव्यता कमी कमी करणे हा आहे. काही थोड्या लोकांनी सत्ता संपादन केल्याने खरे स्वराज्य येणार नसून सत्तेचा दुरुपयोग होत असताना त्या सत्तेचा प्रतिकार करण्याची शक्ती सर्वांच्या अंगी येण्यात खरे स्वराज्य म्हणजे लोकराज्य आहे हे दाखवून देण्याची मी आशा बाळगली आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर सत्तेचे नियम करण्याची व तिच्यावर नियंत्रण ठेवण्याची आपल्यात शक्ती आहे ही जाणीव शिक्षणाने लोकांमध्ये उत्पन्न करून स्वराज्य प्राप्त करून घ्यायचे आहे. गांधीजींनी तत्कालीन कालखंडात मांडलेली वरील भूमिका वर्तमानकालीन राजकारण पाहिल्यास विचारात घेण्यासारखी आहे.

आज संपूर्ण जगभरात धार्मिक कट्टरता वाढताना दिसते आहे. इतर धर्माचा तिरस्कार करण्याकडे कल वाढतो आहे. त्यातून धार्मिक संघर्ष उद्भवतो आहे. माझा धर्म श्रेष्ठ ही वाढत असलेली मानसिकता मानव जातीला आव्हान ठरते आहे. महात्मा गांधीजींनी सर्व धर्मांना महत्त्व दिले होते. त्यांचा आदर केला होता. जगातल्या सर्व धर्मांना शांतीचा मूलमंत्र दिला होता. धर्माच्या नावावर होणाऱ्या हिंसेला गांधीजींचा विरोध होता. अलीकडील काळात धर्माच्या पुनर्जीवनाचा होत असलेला प्रयत्न पाहता गांधी विचाराची प्रस्तुतता दिसून येते. त्याची उजळणी आवश्यक ठरते. दलितांवर हल्ले, गोवंश हत्या व त्यातून निर्घृण खून, गोमांस खाण्याच्या कारणावरून हत्या, काश्मीर ३७० कलम आणि नागरिकत्व दुरुस्ती कायदा या काही महत्त्वाच्या घटना- घडामोडींच्या मुळाशी धर्म असल्याचे दिसून येते. काही राजकीय पक्ष हिंदुत्व हाच आमचा राजकीय अजेंडा असल्याचे सांगत सनातन धर्माचा उद्घोष करतात. हिंदू धर्म, हिंदू राष्ट्र, हिंदुत्ववादी विचारांचा सातत्याने उच्चार करतात. गांधीजी मात्र सत्य, शिव, न्याय, समता, प्रेम आणि सौंदर्य आदी मूल्यांवर श्रद्धा असणे म्हणजे धर्म मानत होते; म्हणून गांधींच्या या विचाराची आज आवश्यकता दिसून येते.

आज उद्योन्मुख भारतीय समाजाची स्थिती कशी आहे ?, राजकारणाचा मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रवेश झाल्याने हस्तक्षेप वाढलेला आहे. शिक्षण क्षेत्र प्रदूषित झालेले दिसून येत आहे. भ्रष्टाचार, गैरव्यवहाराचे प्रमाण वाढत असून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करणारे लोक उजळ माथ्याने समाजात फिरत आहेत. श्रमप्रतिष्ठेऐवजी श्रमाविना संपत्ती कशी मिळेल या विचाराने तरुण पिढी ग्रासलेले आहे. सत्ता, संपत्तीचे अधिक महत्त्व वाढल्याने ते मिळविण्याकरिता अनैतिक मार्गाचा उपयोग केला जातो आहे. बेकारीची समस्या उग्र रूप धारण करीत आहे. परिणामतः तरुणांमध्ये व्यसन, निराशा, उदासीनता वाढत आहे. सामाजिक वातावरण कमालीचे दूषित झालेले आहे. यांत्रिकीकरणाने उत्पादनक्षमता वाढते म्हणून त्यास प्राधान्य दिले जात आहे. संपूर्ण मानवी जीवनच यंत्रमय झालेले आहे. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या स्वीकारामुळे आर्थिक सामाजिक विकास वाढताना दिसतो आहे; मात्र त्यात व्यक्तिगत विकासाला सर्वाधिक महत्त्व दिले जात आहे. यंत्राचा कमीत कमी वापर करून मनुष्यबळाचा विकास करण्याबाबत गांधीजी आग्रही होते. तसेच विकासाची पावले ही माणसाच्या अंतर्मनात उचलली जायाला हवीत असेही त्यांना वाटत होते. मात्र गांधी विचारातील ही तत्वे आज कितपत लागू ठरत आहेत हा विचाराचा विचाराधीन भाग आहे. मनुष्याने लोभ बाजूला ठेवून सामाजिक कल्याणासाठी आपले योगदान द्यावे हा त्यांचा विचारही आज बदलत्या काळातील जीवनशैलीच्या अनुषंगाने विचार करता विसंगत दिसून येतो आहे. "जागतिकीकरणाने निर्माण केलेली परिस्थिती लक्षात घेता आजच्या आधुनिक भांडवली व टोकाच्या विषम समाजाचा तंत्रज्ञानाने कब्जा मिळवलेल्या समाजाचा पर्याय

शोधताना गांधी विचार अटळ ठरतो".४ हे किशोर बेडकीहाळ यांचे वरील संदर्भातील निरीक्षण गांधी विचार समजून घेण्याकरिता महत्वपूर्ण असे आहे.

पर्यावरण ही एक जागतिक समस्या बनलेली आहे. 'हिंद स्वराज्य' या आपल्या ग्रंथात गांधीजी या समस्येचे सुतोवाच करतात. गांधी विचारांची ही प्रासंगिकता आज अनन्यसाधारण महत्त्वाची आहे. पर्यावरणाच्या शाश्वत विकासाची दृष्टी ते ग्रंथातून देतात. "ही पृथ्वी, हवा, भूमी, पाणी हे सर्व म्हणजे आपल्या बापजाद्यांनी वारसा हक्काने दिलेली मालमत्ता नव्हे तर ते पुढील पिढ्यांसाठीची जोखीम होय. ती किमान जशीच्या तशी त्यांच्या हाती सोपवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे." या गांधीजींच्या पर्यावरण विषयक विचारातून त्यांचे द्रष्टेपण दिसून येते. गांधीजींनी केवळ राजकीय चळवळीला आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये प्राधान्य देऊन कार्य केले नाही. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रात मानवतावादी दृष्टीकोनातून त्यांनी कार्य केल्याचे दिसून येते. ज्याचे प्रतिबिंब अखंड भारताच्या सार्वजनिक जीवनावर उमटलेले आहे. "परकीय सत्तेशी सामना देता देता एका नव्या धरतीचा माणूस व समाज भारतामध्ये निर्माण व्हावा ही गांधीजींची दृष्टी होती",५ हा गांधी कार्यासंबंधी यशवंतराव चव्हाण यांनी काढलेला सार गांधींचे प्रत्येक व्यक्तीसंबंधी आणि राष्ट्रसंबंधी केलेले कार्य पाहता उचित वाटतो. गांधी विचारांचा समाज मनावर अमिट ठसा उमटला होता. त्यांचे विचार दीर्घकालीन स्वरूपाचे होते. त्यामुळेच त्या विचारांची समकालीनता दिसून येते. वर्तमानकालीन अनेक घटना प्रसंग आणि घडामोडींमध्ये गांधी विचारांची होणारी उजळणी आणि दिसून येणारी प्रासंगिकता पाहता हेच स्पष्ट होते की गांधी विचार हे युगानयुगे पुरणारे विचार आहेत.

**सारांश:**

गांधीवाद ही आधुनिक काळातील सर्वाधिक प्रभावी विचारप्रणाली आहे. महात्मा गांधीजींनी सांगितलेल्या सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, ब्रह्मचर्य, सर्वधर्मसमभाव या जीवन मूल्यातून उदयास आलेल्या गांधीवादाचा जनमानसांवर प्रभाव पडून त्यांची जीवनदृष्टी तयार झाली. अध्यात्मवाद, परंपरा आणि आधुनिकता यांच्या समन्वयातून उभा राहिलेल्या विचारधारेने जगातील विचारवंतांना आकर्षित केले. त्यातून सर्वांना उपयुक्त ठरेल अशा गांधीवादी विचारांचा स्वीकार होऊ लागला. राजकीय, सामाजिक, आर्थिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असणाऱ्या गांधीवादी विचारधारेची समकालीन प्रस्तुतता आजही ठळकपणे ध्वनीत होते. सत्याग्रह,अहिंसा या तत्त्वांना वैश्विकता प्राप्त झाली तर धार्मिक व नैतिक दृष्टिकोनाने समतावादाचे बिजारोपण केले. हे सर्व विचार आजही कालसुसंगत ठरतात.

वरील अभ्यासाअंती काही निवडक निष्कर्ष नोंदवणे आवश्यक वाटते ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) सत्य, अहिंसा, शांतता ही गांधीवादाची मूल्ये जगातील सर्व संस्कृतींना बळ देणारी असल्याने ती चिरंतन ठरतील असे दिसून येते.

२) बदलत्या काळातही गांधी विचारांचा आशय अधिकाधिक स्पष्ट होत जाईल व त्या प्रभावातून उद्योन्मुख भारतीय समाजाच्या विकासाला गती प्राप्त होईल.

३) रामराज्य, विज्ञान- तंत्रज्ञान या संकल्पनांच्या संबंधातील गांधीजींची भूमिका आणि त्या संदर्भात त्यांनी व्यक्त केलेल्या विचारामागील मनोविश्व याची चिकित्सा आवश्यक वाटते.

**संदर्भ :**

१) गो. म. कुलकर्णी गांधी विचाराला मराठी साहित्याने दिलेला प्रतिसाद डॉ. सुभाष वाघमारे शिविम डिसेंबर 2019 पृष्ठ:५

२) महात्मा गांधी, माझे सत्याचे प्रयोग, प्रस्तावना पृष्ठ ८-९

३) महात्मा गांधींच्या विचारांचा अर्थ आणि शेवट २७ सप्टेंबर २०२१ ऑनलाइन लेखांमधून

४) किशोर बेडकीहाळ, गांधी : जीवन आणि कार्य प्रस्तावना

५) यशवंतराव चव्हाण, ऋणानुबंध, प्रेस्टिज प्रकाशन पुणे १९८६ द्वितीय आवृत्ती पृष्ठ १३१-१३३.